# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १६/०५/२०२४

## ➢ गैरकायदा मंडळी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | . नागपुरी गेट अमरावती शहर / अप क्र.१८२/२० २४ कलम ५०४, ५०६(ब) १४३, १४७, १४८, १४९ भा. द. वि. | रतनगंज पहिला नागोबा ओटा अमरावती | दि. १४.०५. २०२४ चे ०३.४५ वा<br><br>दि .१५.०५. २०२४ चे १८.२५ वा | शेख ईरफान उर्फ अंगा शेख कलीम वय २२ वर्ष रतनगंज पहीला नागोबा ओटा अमरावती | १.शेख रहीम उर्फ हुंगा<br>२.शेख जमीर उर्फ बाबा<br>३.सोनु (हुंगा का लडका )<br>तिन्ही रा गवळीपुरा अमरावती<br>४.मोहम्मद अनिक रा ताजनगर अमरावती<br>५.ईमरान मंत्री रा भुरकापुर मद्राशी बाबा दर्गा अमरावती | यावेळी नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा घरी झोपला असता त्याचे मो न क्र वर मो न क्र वरून फोन आला त्या फोन वरून आरोपी मोहम्मद अनिक व त्याचा मित्र ईमरान मंत्री याने फिर्यादीस पहिला नागोबा ओटा येथे बोलावले वरून फिर्यादी पहिला नागोबा ओटा रतनगंज येथे गेला असता त्याचे मागे त्याची आई सुदृधा गेली त्या ठिकाणी मोहम्मद अनिक ईमरान मंत्री शेख रहिम उर्फ हुंगा शेख जीमल उर्फ बाबा सोनु (हुंगा का लडका ) हे पाच जन हजर होते मोहम्मद अनिक व ईमरान मंत्री याच्या हातात चाकु होते तेव्हा हुंगा बाबा आणि सोनु यांनी जोराने ओरडुन मोहम्मद अनिक आणि ईमरान मंत्री यांना म्हटले कि मारो इसको त्यावेळी फिर्यादीची आई हिने फिर्यादीस पकडले तेव्हा सोनु याने फिर्यादीच्या आईस शिविगाळ केली आणि म्हटले कि तेरे लडके को बचाले तेरा छोकरा भी नही बचेगा असा जिवे मारण्याच्या धमक्या देवुन फिर्यादीस व फिर्यादीच्या आईला शिविगाळ केली अशा फिर्यादीच्या जबाणी रिर्पोट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## विनयभंग :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजापेठ अप क्र २८४/२०२४कलम ३५४, ३५४ अ, ३५४ ड , ३२३,३२४, ५०४,५०६ ,३४भादवी | अमरावती | घ.ता .वेळ दि.१५/५/२०२४ चे १२.३०वा दरम्याण दा.ता.वेळ. दि.१५/०५/२४ चे २०.३५वा. | एक महिला | १.कूणाल पवार रा. तेल्हारा .जि.अकोला आदीत्य ढोकणे . ऋतीक अवचार | हकीकत अशा प्रकारे आहे की फि.ला दि १३/०५/२०२४ रोजी रात्री रात्री २१.०० वा सूमारास कॉल केला असता फि. ने त्याला विचारले कशाला फोन केला तेव्हा कूणाल याने फि. ला म्हटले मला तूझ्या सोबत राहायचे आहे त्यावेळी फि.हिने कूणाल याला नकार दिला तेव्हा त्याने फि.हीला शीवीगाळ केली दि १५/०५/२०२४ रोजी फि.हि कॉलेज मधून पेपर देवून गेट च्या बाहेर आली असता आरोपी कूणाल हा फि.ला दिसला ती तेथून स्कूटीने नीघाली असता कूणाल हा फि. च्या पाठी मागे बाइक घेवून आला त्यामूळे तीच्या मीत्रांना कॉल करून मदती करीता बोलाविले फि. ही स्कूटीने समोर गेली व गणेश कॉलनी महाराणा प्रताप गार्डन येथे थांबली त्यावेळी फि. चे मीत्र पाठीमागेच येत होते तेथे कूणाल हा त्याचे मीत्रा सह दोन बाइकवर आला कूणाल सोबत त्याचे मीत्र आदीत्य ढोकणे . ऋतीक अवचार हे होते त्यावेळी फि. हिने कूणाल ला विचारले तू पाठलाग का करतोस कूणाल ने फि. ला म्हटले की मला तूझ्या सोबत राहायचे आहे तू माझ्या सोबत राहा असे म्हणू लागला फि. ने नकार दिला असता कूणाल याने फि. चे अंगावर जावून हाताने तोंड पकडून फि. हिला जबरदस्ती केली तेव्हा फि.च्या मीत्र हे तीच्या मदती करीता पोहचले तेव्हा फि.चा मीत्रे याला ऋतीक अवचार याने पकडून मारहान केली व अरोपी आदीत्य ढोकणे याने त्याच्या जवळील काठीने फि.चामीत्र यास डोक्यावर व हातावर मारले व कूणाल याने फि.ला व तीच मीत्रांना मारहाण केली . अशा फी चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो स्टे कोतवाली अप क्र १८७.२४ कलम ३५४ अ भादवि | अमरावती | घटना ता वेळ दिनांक १४.०५.२४ चे १६.०० वा<br><br>दाखल ता | **एक महिला** | नरेश सोनवाल रा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की दिनांक १४.०५.२४ रोजी दुपारी ०४.०० वा मी माझे घरी होती माझे पती हे घरासमोर उभे होते मला माझे घराजवळ जोरजोराने ओरडण्याचा व भांडण्याचा आवाज आला म्हणुन मी घराबाहेर येवुन पाहीले असता नरेश सोनवाल याचे घरासमोर माझे पती रोडवर खाली पडलेले दिसले व त्यांना नरेश सोनवाल व त्याचे मामाचे मुल लाथाबुक्यानी मारहान करीत होते म्हणुन मी माझे पतीला वाचविण्याकरीता गेली असता नरेश सोनवाल याने माझे कडे वाईट नजरेने पाहुन त्याने सर्वासमो र माझा उजवा हात पकडला त्यामुळे माझे मनात लज्जा निर्माण झाली व त्याने मला लोटुन दिले त्यामुळे खाली |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेळ दि १५. ०५.२४ चे २०.२८ वा | | | पडली व त्यामुळे माझे पोट दुखु लागले मी ७महीन्याची गर्भवती आहे आज रोजी नरेश सोनवाल याचे विरुध्द रिपोर्ट देण्यात आली अशा फिचे जबानी रि वुरुन सदरचा गुन्हा दाखल |
| 3 | खोलापुरी गेट अप.क्र. 131/2024 कलम 354 भादवि | अमरावती | दिनांक 15/5/2024 चे 18/00 वा दाखल ता. वेळ 15/05/2024 चे 23/16 वा | एक महिला | अर्जुन जानराव इंगोले वय 40 वर्ष अमरावती | हकिकत अश्या प्रकारे आहे की, यातील फिर्यादी ही घरी हजर असतांना नमुद घटना ता वेळी व ठिकाणी आरोपी हा फिर्यादी चे घरात येवुन तिला लोखंड कापणे करीता इलेक्ट्रीक लाईट मागीतली असता फिर्यादीने लाईट देण्यास नकार दिला तर आरोपीने फिर्यादीचे हाताला धरुन तिला ओढ वाढ केली आरोपी हा मागील दोन महीण्या पासुन फिर्यादीला वाईट नजरेने पाहत होता त्या मुळे फिर्यादीचे मनात लज्जा निर्माण झाली अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा कलम 354 भा.द.वी चा दाखल |

## घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पो स्टे फ्रेजरपुरा अप. क्र. ४५८/२४ कलम ४५४, ४५७, ३८० भा.द.वि., | भरणी ले आऊट मंगलधाम हिलटॉप कॉलनी अमरावती | दि. १४.०५.२०२४ चे दुपारी १३.३० ते १५.०५. २०२४ चे ०९.०० वा. दरम्याण<br><br>दि. १५.०५.२०२४ चो १८.५६ वा. | प्रविण विलास खंडेराव वय ३१ वर्ष, रा. भरणी ले आऊट मंगलधाम हिलटॉप कॉलनी अमरावती | अज्ञात | हकीगत अशा प्राकरे आहे कि, यातील फिर्यादी हे त्यांचे सहकारी सेवानिवृत्तीचा कार्यक्रम असल्याने त्यांचे कुंटुंबासह घटना ता. वेळी जलम येथे गेले होते. दि. १५.०५.२०४ रोजी सकाळी ०९.०० वा. सुमारास त्यांचे घराशेजारी राहनारे प्रमोद भासले यांचा फोन आला व त्यांनी सांगीतले कि, फाटकाला कुलुप लागलेले असुन घराचा दरव ाजा उघडा दिसत आहे तुझे घरपी चोरी झाल्याचे दिसत आहे अस`सांगन्यावरुन फि. हे घरी परत आले असता घरात जावुन पाहीले तर बेडरुममधील लोखंडी कपाट उघडे दिसले त्यामधील नगदी १५,०००/- रु. व मुलीचे १० ग्राम सोन्याचे दागीने कि. ३५,०००/- रु. असे दिसलो नाही कपाटातील वस्तु अस्ताव्यस्त दिसले कोणीतरी अज्ञात चोराने घराचा दरवाजाचा कुलुप कोंडा तोडुन आत प्रवेश करुन १० ग्राम सोन्याचे दागीने व नगदी १५.०००/- रु. असा एकुण ५०,०००/- रु. चा माल चोरुन नेला अशा जबानी रि. वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती | अप्परवर्धा वसाहत अमरावती | गु.घ.ता.वेळ दि.१६/०४/२०२४ ते दि.०२/०५/२०२४ | ऋषिकेश गजानन घुरडे वय ३२ वर्ष रा. अप्परवर्धा वसाहत अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे मा.मुख्य अधियंता सोहेब असुन त्यानी नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी जलश्री वर्धा येथे जकवार कंपनीचा एकुण ७ नग नळ बसविले होते कि.अं५००/- रु.प्रत्येकी नग एकुण ३५००/- व मा.साहेब यांच्या ऑफिस मध्ये एक ०१.०५ टन ची ब्लु स्टार कंपनीचे एसी कि.अं.१५००/- रु.असा एकुण १८५००/- रु.चा मुद्देमाल मा.साहेब |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अपक्र ४६६-२४ कलम- ४५४,४५७,३८० | | माहीती दा.ता.वेळ दि.१५/०५/२०२४ चे १७.२२ वा | | | याच्या ऑफीसमध्ये व बंगल्यामध्ये राहण्यास नव्हते सदर चौकीदार नामे किशोर गुमाळे यांनी फोन व्दारे माहीती दिली की कोणीतरी अज्ञात चोराने बंगल्यामध्ये व ऑफिस मध्ये प्रवेश करुन सदर वस्तु चोरुन नेल्या अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती अपक्र ४६७-२४ कलम- ४५४,४५७,३८० , भादवी सहकलम | गुरु गजानन धाम अमरावती | गु.घ.ता.वेळ दि.११/०४/२०२४ चे ११.०० वा.ते दि.१५/०५/२०२४ चे सकाळी १०.३०वा दरम्याण माहीती दा.ता.वेळ दि.१५/०५/२०२४ चे १८.०० वा | अभिषेक गोपाल भानगे वय२१ वर्ष रा. गुरु गजानन धाम अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातिल फिर्यादी वडीचे नामे गोपाल भानगे वय ४५ वर्ष हे अयोध्या येथे दर्शना करीता गेले त्याच दिवशी सांयकाळी फिर्यादीची आई व बहीन इलमगाव ता.वरुड जि.अमरावती येथे गेले असता दि.१५/०५/२४ रोजी १०.३० वा.परत आले असता फि.चे राहते घरी आले असता फि ला त्याचे घराचे दरवाजा उघडा असलेला दिसला फि ने घरात जावुन पाहणी केली असता बेडरुम मधिल दोन्ही कपाट उघडे दिसुन आले आई व बहीन यानी पाहणी केली असता कपाटा मध्ये ठेवली रोख रक्कम एकुण ६५०००/- रु. मोठी बहीनी हीचे कानातील दोन जोड सोन्याचे ११ ग्रॅम कि.अं.३३०००/- रु.,एक जोड चांदीच्या तोरड्या ४० ग्रॅम कि.अं.२०००/रु.५ ग्रॅम चांदीच्या अंगठ्या एकुण वजन ५० ग्रॅम कि.अं.२०००/- रु.असा एकुण १०२०००/- रु.चा मद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला .लागलीच दाखल |

## चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजापेठ अप क्र २८३/२०२४ कलम ३८० भादवी | बापटवाडी गोगाजी माहराज समाज मंदीर अमरावती | घ.ता .वेळ दि.१५/०५/२०२४ चे १५.००वा दा.ता.वेळ. दि.१५/०५/२४ चे १७.०४वा | सूरज नारायण ग्रोवर वय ६५ वर्ष रा. जय नगर मनोहर कार्यालयाचे मागे अमरावती | विक्की प्रमोद ग्रोवर रा. बेलपूरा अमरावती | थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की नमूद घ.ता.वेळी व ठिकाणी बापटवाडी गोगाजी माहराज समाज मंदीर अमरावती येथे बांधकाम सूरू होते व यातील आरोपी याने काम करणारे मजूरांना शीवीगाळ करून मंदीरातील दान पेटी चोरून नेली दाण पेटी मध्ये नगदी ५०००रू. व दान पेटी ची कि.२०० रु. असाएकून ५२००रू. चा मूददेमाल चोरून नेला अशा फी चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ जुगार रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा | ४५६/२४ कलम १२(अ) म.जु.का. सहकलम १०९ भा .द.वि. | विर प्रताप मंडळ जवळील खुल्या जागेवर पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती | दि. १५.०५. २०२४ चे १३.३० वा. | दि. १५.०५.२०२४ चे १७.२५ वा. | पो.हे.कॉ. रज्जाक शेकुवाले ब.नं. १५७, पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती | (१)सागर भगवान गुळधे वय ३२ रा. रद्दीपुरा अमरावती (२) आकाश गणेश चांक वय २२ रा. रद्दीपुरा अमरावती (३) अरुण ताराचंद खाकसे (फरार)वय ३८ रा. रद्दीपुरा अमरावती (४) अमर गुळधे रा. रद्दीपुरा अमरावती | हकीगत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादीने मिळालेल्या गुप्त माहीतीवर जुगार रेड केली असता नमुद ठिकाणी इसम जुगार खेळतांना दिसुन आले पोलीसांची चाहुल लागताच जुगार खेळनारे लोक पळुन गेले घटनास्थळावर तिना इसम मिळुन आले व एक इसम फारार मिळालेल्या इसमांचे ताब्यातुन सट्टापट्टाचे चिठ्या व नगदी ३५१०/- रु. २ डॉटपेन कि. २० रु. एकुण कि. ३५३०/- रु. चा जुगार माल मिळुन आला अशा फि. चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | फ्रेजरपुरा | ४५७/२४ कलम १२(अ) म.जु.का. सहकलम १०९ भा .द.वि. | अमर मंडलेचे घराजवळ पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती | दि. १५.०५. २०२४ चे १४.३५ वा. | दि. १५.०५.२०२४ चे१७.४८ वा. | पो.हे.कॉ. रज्जाक शेकुवाले ब.नं. १५७, पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती | (१)सचिन शामराव वानखडे वय ४० रा. खंडेलवाल कंट्रोल फ्रेजरपुरा अमरावती (२) सलमान खान जलील खान | हकीगत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादीने मिळालेल्या गुप्त माहीतीवर जुगार रेड केली असता नमुद ठिकाणी इसम जुगार खेळतांना दिसुन आले पोलीसांची चाहुल लागताच जुगार खेळनारे लोक पळुन गेले घटनास्थळावर तिना इसम मिळुन आले व एक इसम फारार मिळालेल्या इसमांचे ताब्यातुन सट्टापट्टाचे चिठ्या व नगदी २७००/- रु. २ डॉटपेन कि. २० रु. एकुण कि. २७२०/- रु. चा जुगार माल मिळुन आला अशा फि. चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | वय ३२ रा. जयस्वाल गल्ली अमरावती (३) अमर मंडले रा. शिव एकता चौक | |

## ➢ प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा | अप क्र ४५५/२० २४ कलम ६५ (F) महा. दारुबंदी कायदा | अवैदयरित्या दारु विक्री | आरोपीचे रहाते घरासमोर नगिना मस्जिद फ्रेजरपुरा अम शहर | दि.१४/० ५/२०२४ चे १७.१५ वा | दि.१५/ ०५/२ ०२४ चे ००.५ ७ वा | सरतर्फे पोहेकॉ रज्जाक शेकुवाले ब नं १५७ पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर | अमिना भैय्याला चौधरी वय ५० वर्ष रा फेजरपुरा अम | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे वरिष्ठांचे आदेशाने पो स्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली वरुन घटनास्थळी पंचासह जावुन पाहणी केली असता यातील आरोपी महिला ही आपले घरासमोर अवैदयरित्या ग्राहकांना गावरानी दारु विक्री करीत असताना दिसुन आली वरुन महिला कर्मचारी सह तिचेवर प्रोव्ही रेड केली असता पोलीसांची चाहुल लागताच ग्राहक इसम मळुन गेले व दारु विक्री करणारी महिला जागीच मिळुन आली तीच्या ताब्यातुन पंचासमक्ष जप्ती पंचनाम्याप्रमाणे २ प्ल ास्टिकची डबकी ५ लिटर ची ज्यामध्ये एकुण १० लीटर गावरानी दारु किं २०००/- रु व डबकी १००/-रु चा माल जागीज मिळुन आला, अशा फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |